**ठराव** :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. १०५ मधील एफ ॲण्ड वी हॉस्पिटल ते आनंद दिघे मार्ग पर्यंताचा कॉक्रीट रस्ता दुरूस्त करणे कामी रक्कम रू. ११,३९,२४६/- पर्यंतच्या खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे तसेच अंदाजपत्रकास तांत्रीक मान्यता देऊन निविदा दर मागविणेस मंजुरी देण्यात येत आहे.

२६/०८

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महामगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय विरार (पू), जि.पालघर, पिन नं.४०१३०५
दुरध्वनी - ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स - ०२५०-२५२५१०७
ई-मेल :- vasaivirarcorporation@yahoo.com

---

प्रशासकीय ठराव क्र. ८७६ — विभाग : बांधकाम विभाग
दिनांक : २६/०८/२०२२

---

प्रस्तावाचा विषय :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ७५ मधील सातिवली पलाटपाडा येथे आर.सी.सी. कल्वर्ट बांधणे.

प्रस्तावाचा मजकूर :- वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ७५ मधील सातिवली पलाटपाडा हे आदिवासी बहुल क्षेत्र आहे. पलाटपाडा येथे जाण्यासाठी तुंगारेश्वर नदी पार करून जावे लागते, त्याशिवाय दुसरा कुठलाही पर्यायी रस्ता येथे पोहचण्यासाठी उपलब्ध नाही. सद्यस्थितीत अस्तित्वात असलेली पाईप उघाडी पुर्णपणे नादुरुस्त झालेली असून या उघाडीवरुन पावसाळ्यात या भागातील रहिवासी जीवाचा धोका पत्करुन ये-जा करत असतात. सदर पुलाचे बांधकाम झाल्यास जिवित हानी टाळता येऊ शकते. याकरीता या भागातील रहिवाश्यांनी पुल बांधून मिळणेबाबत माजी नगरसेवक सो. यांचेकडे मागणी केली आहे. सदर भागाची पाहणी करुन आर.सी.सी. कल्वर्ट बांधणे आवश्यक आहे. सबब या ठिकाणी करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१/२२ या वित्तीय वर्षाचे सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा दरसुची नुसार अंदाजपत्रक तयार करणेत आले आहे. उपरोक्त नमुद केलेल्या कामाकरीता रक्कम रु. १,००,९३,०५३/- इतका खर्च अपेक्षित आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १) | वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती 'जी' वालीव क्षेत्रातील वॉर्ड क्र. ७५ मधील सातिवली पलाटपाडा येथे आर.सी.सी. कल्वर्ट बांधणे. | रु. १,००,९३,०५३/- |

या करीता वर नमुद करावयाच्या बांधकाम संबंधित कामाचे सन २०२१-२२ या वित्तिय वर्षाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग जिल्हा दरसुचीनुसार कामाचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

ठराव :- उपरोक्त कामास रक्कम रु. १,००,९३,०५३/- इतक्या अंदाजपत्रकीय खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत असून सदर कामाच्या अंदाजपत्रकास तांत्रिक मंजुरी घेवून पुढील निविदा प्रक्रीया करणेस मान्यता देणेत येत आहे.

25/08

(अनिलकुमार पवार)
मा.आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

प्रशासक ठराव क्र. ८९७ दिनांक :- २६/०८/२०२२

---

**विषय :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती "एच" मधील वॉर्ड नं. 104 मध्ये उमेळमान येथे प्रतापगड ते चंद्रघंटा इमारत ते जि.प.शाळेपर्यत गटार बांधणे व स्लॅब टाकणे कामी प्राप्त निविदांपेकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करुन संविदा करण्यास मान्यता देणेबाबत.

प्रशासकीय मान्यता :- मा.आयुक्त तथा प्रशासक हयांचे कडील ठराव क्र. 671 दि. 08/10/2021

अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. 41,52,605/

तांत्रिक मान्यता :- मा.शहर अभियंता हयांच्याकडील दि. 03/12/2021

तांत्रिक मान्यतेअंती अंदाजपत्रकीय रक्कम :- रु. 41,52,605/-

जाहिर ई-निविदा सुचना :- 1) दै.सामना

ई-टेण्डरींग व्दारे प्रथमफेर निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/1237/2022 दि.12/02/2022, शहर अभियंता , वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिद्धी दिनांक :- दि.22/02/2022

वृत्तपत्रामील नाव व पृष्ठ क्रमांक :- दै.फ्रि प्रेस जर्नर, दै.लोकसत्ता, द.लोकनायक

ई-टेण्डरींग व्दारे व्दितीय फेर निविदा प्रसिध्दी :- वविशम/बांध/2188/2022 दि.03/03/2022, शहर अभियंता , वसई विरार शहर महानगरपालिका

वृत्तपत्रातील निविदा सुचना प्रसिद्धी दिनांक :- दि.04/03/2022

वृत्तपत्रामील नाव व पृष्ठ क्रमांक :- दै.फ्रि प्रेस जर्नर, दै.लोकसत्ता, द.लोकनायक

ई.टेण्डरींग फॉर्म खरेदी व ऑनलाईन तयारीची तारीख (प्रिपरेशन व स्विकारण्याची) :- दि. 04/03/2021 दु. 3.00 पासुन ते दि.08/03/2022 ते दु.03.00 पर्यत

प्राप्त निविदा :- 05

प्रथम लखोटा उघडल्याचा दिनांक :- दि.09/03/2022 सायं. 4.00 वाजता

व्दितीय लखोटा उघडल्याचा दिनांक :- दि.29/06/2022

प्राप्त निविदांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे

| अ.क्र | निविदा धारकांचे नाव | निविदा दर |
|---|---|---|
| 1 | मे.ओमकार कंन्स्ट्रक्शन | 0.10% कमी |
| 2 | मे.शशिकांत सुधाकरराव राजहंस | 30.18% जादा |
| 3 | मे.महाविर एन्टरप्रायझेस | 32.33% जादा |
| 4 | मे.व्दारका कंन्स्टक्शन | 15.00% जादा |
| 5 | मे.रोहन किसन मोहिते | 10.00% जादा |

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे.ओमकार कंन्स्ट्रक्शन यांची 0.10% कमी दराची निविदा कमी अंदाजपत्रकीय दर हा इतर निविदेच्या तुलनेत कमी व वाजवी आहे. सदारच्या दरास निविदा समितीने दि. 18/07/2022 रोजीच्या बैठकीत मान्यता दिलेली आहे.

तरी मे.एस.एस.एन्टरप्रायझेस यांच्या अंदाजपत्रकीय दर हा इतर निविदेच्या तुलनेत कमी व, योग्य व वाजवी असुन मे.ओमकार कंन्स्ट्रक्शन हयांची निविदा अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा 0.10% कमी दराची निविदा असल्याने मंजुरीस्तव सादर. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये संविदा करणेसाठी मा.आयुक्त तथा प्रशासक हयांच्या मंजुरीस्तव सादर.

**लघुत्तम निविदा धारक व दर बाबत विभागाचा अभिप्राय :-**

उपरोक्त निविदांची तुलना केली असता मे.ओमकार कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदेतील 0.10% कमी दर तुलनात्मकरित्या इतर निविदांच्या तुलनेत कमी व योग्य आहे.

तरी मे.ओमकार कंन्स्ट्रक्शन यांच्या निविदेतील 0.10% कमी दराच्या निविदेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) नुसार मान्यता देण्यास व त्यांच्याबरोबर संविदा करण्यास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव मा.आयुक्त तथा प्रशासक यांचेकडे सविनय सादर.

**प्रस्तावाचा निर्णय :-**उपरोक्त निविदांची तुलना करता मे.ओमकार कंन्स्ट्रक्शन हयांची अंदाजपत्रकीय दरापेक्ष 0.10% कमी दराची निविदा योग्य वाजवी आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 73 (क) अन्वये हया कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त तथा प्रशासक संविदा करणेस मान्यता देत आहे.

25/07

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

p|25

# वसई- विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पूर्व), जि.- पालघर, पिन नं. 401 305
दूरध्वनी- 0250-2525101/02/03/04/05/06, फॅक्स – 0250-2525107
ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकिय ठराव क्र. ८१८

विभाग : वैद्यकीय आरोग्य
दिनांक :२६/८/2022

**प्रस्तावाचा विषय** - राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत विविध पदांवरील कार्यरत कर्मचा-यांना माहे मार्च २०२२ ते फेब्रुवारी २०२३ पर्यंतचे शासन धोरणानुसार मानधन महानगरपालिकेच्या निधीतून अदा करणेकरीता Vasai-Virar City Municipal Corporation's Integrated Health & Family Welfare Society Other/Non PIP Funds यांच्या बँकेच्या खात्यात रक्कम वर्ग करणेकरीता प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर** : - वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात महानगरपालिकेची ५ रुग्णालये, ३ माता बाल संगोपन केंद्रे व २२ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय आरोग्य विभागाच्या राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत ११ महिन्याच्या कंत्राटी पध्दतीवर प्रकल्प अमंलबजावणी आराखडयामध्ये मंजुर केल्यानुसार विविध पदांवरील कर्मचारी कार्यरत आहेत.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियानच्या प्रकल्प अमंलबजावणी आराखडयात कार्यरत कर्मचाऱ्यांना त्या त्या पदांच्या नियमीत वेतनश्रेणीच्या पहिल्या टप्यावरील मानधन व भत्ते (उदा. मुळवेतन +ग्रेड पे+ महागाई भत्ता+घरभाडे भत्ता+ प्रवास भत्ता) मिळून वेतनाच्या ९०% इतके मानधन अदा करणेकरीता संदर्भ क्र.१ अन्वये मा.महासभा दि.२०/०४/२०१८ ठराव क्र.८ अन्वये मान्यता दिली असताना राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना उपरोक्त ठरावानुसार मानधन व भत्ते वेतनाच्या ९०% प्रमाणे महानगरपालिकेच्या निधीतून अदा करण्यात येत आहेत.

उपरोक्त संदर्भ क्र.२ अन्वये महागाई भत्याचा दर शासनाने १६४% केला आहे. उपरोक्त संदर्भ क्र.१ मधील नमुद ठरावा अन्वये राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत कर्मचाऱ्यांना संवर्ग निहाय नियमीत कर्मचाऱ्यांच्या मानधनाच्या ९०% प्रमाणे महानगरपालिकेच्या निधीतून अदा करणेकरीता मंजुरी देण्यात आली आहे.

**तक्ता क्र.१**

| अ.क्र | पदनाम | मंजूर पदे | भरलेली पदे | रिक्त पदे |
|---|---|---|---|---|
| १ | वैद्यकीय अधिकारी (पुर्ण वेळ) | १३ | ६ | ७ |
| २ | स्टाफ नर्स (जी.एन.एम) | २१ | १९ | २ |
| ३ | लॅब टेक्निशियन | २१ | १७ | ४ |
| ४ | फार्मासिस्ट | १९ | १४ | ५ |
| ५ | शहर कार्यक्रम व्यवस्थापक | १ | ० | १ |
| ६ | शहर गुणवत्ता आश्वासक समन्वयक | १ | ० | १ |
| ७ | शहर लेखा व्यवस्थापक | १ | १ | ० |
| ८ | डाटा एन्ट्री ऑपरेटर कम अंकाउटंट | ११ | ०५ | १६ |
| ९ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | २ | ० | ० |
| १० | कार्यक्रम सहाय्यक | १ | १ | ० |
| ११ | अटेडन्ट | १२ | ०३ | १८ |

**तक्ता क्र. २**

| अ.क्र | पदनाम | वेतनश्रेणी | मुळवेतन | ग्रेडपे | एकूण बेरीज | महागाई भत्ता (१६४%) | घरभाडे भत्ता (२०%) | प्रवास भत्ता | एकूण बेरीज | ९०% प्रमाणे वेतन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्टाफनर्स (जी.एन.एम) | ९३००-३४८००-४३०० | ९३०० | ४३०० | १३६०० | २२३०४ | २७२० | ४०० | ३९०२४ | ३५१२२ |
| २ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ५२००-२०२००-२८०० | ५२०० | २८०० | ८००० | १३१२० | १६०० | ४०० | २३१२० | २०८०८ |
| ३ | औषधनिर्माता | ५२००-२०२००-२८०० | ५२०० | २८०० | ८००० | १३१२० | १६०० | ४०० | २३१२० | २०८०८ |
| ४ | शहर कार्यक्रम व्यवस्थापक | ९३००-३४८००-४४०० | ९३०० | ४४०० | १३७०० | २२४६८ | २७४० | ४०० | ३९३०८ | ३५३७७ |
| ५ | शहर गुणवत्ता आश्वासक समन्वयक | ९३००-३४८००-४४०० | ९३०० | ४४०० | १३७०० | २२४६८ | २७४० | ४०० | ३९३०८ | ३५३७७ |
| ६ | शहर लेखा व्यवस्थापक | ९३००-३४८००-४४०० | ९३०० | ४४०० | १३७०० | २२४६८ | २७४० | ४०० | ३९३०८ | ३५३७७ |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | डाटा एन्ट्री ऑपरेटर कम अंकाउटंट | ५२००-२०२००-२४०० | ५२०० | २४०० | ७६०० | १२४६४ | १५२० | ४०० | २१९८४ | १९७८६ |
| ८ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | ५२००-२०२००-२४०० | ५२०० | २४०० | ७६०० | १२४६४ | १५२० | ४०० | २१९८४ | १९७८६ |
| ९ | कार्यक्रम सहाय्यक | ५२००-२०२००-२४०० | ५२०० | २४०० | ७६०० | १२४६४ | १५२० | ४०० | २१९८४ | १९७८६ |
| १० | अटेंडंट | ४४४०-७४४०-१३०० | ४४४० | १३०० | ५७४० | ९४१४ | ११४८ | ४०० | १६७०२ | १५०३१ |

कार्यरत पदांनुसार शासनाचे मानधन व महानगरपालिकेचे मानधन असे एकूण होणारे मानधन खालील प्रमाणे

**तक्ता क्र. ३**

| अ.क्र | पदनाम | कार्यरत पदे | १६४% महागाई भत्तानुसार मानधन (प्रति माहे) | शासना मार्फत मानधन (प्रति माहे) | महानगरपालिका मार्फत मानधन (प्रति माहे) | वर्षभराकरीता महानगरपालिके मार्फत मानधन (माहे मार्च २०२२ ते फेब्रुवारी २०२३) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शहर लेखा व्यवस्थापक | १ | ३५३७७ | ३१३०४ | ४०७३ | ४८,८७६/- (४०७३ X १ X १२) |
| २ | स्टाफ नर्स (जी.एन.एम) | १९ | ३५१२२ | २०००० | १५१२२ | ३४,४७,८१६/- (१५१२२ X १९X १२) |
| ३ | औषधनिर्माता | १३ | २०८०८ | १७००० | ३८०८ | ५,९४,०४८/- (३८०८ X १३X १२) |
| ४ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | १६ | २०८०८ | १७००० | ३८०८ | ७,३१,१३६/- (३८०८ X १६ X १२) |
| ५ | डाटा एन्ट्री ऑपरेटर कम अंकाउटंट | ५ | १९७८६ | १८९०० | ८८६ | ५३,१६०/- (८८६ X ५ X १२) |
| ६ | कार्यक्रम सहाय्यक | १ | १९७८६ | १८००० | १७८६ | २१,४३२/- (१७८६ X १ X १२) |
| ७ | अटेंडंट | ३ | १५०३१ | १७०८९ | ० | ० |
| | एकूण | ५८ | | | | ४८,९६,४६८/- |

**तक्ता क्र. ४ रिक्त पदे भरली असता होणारे एकूण मानधन**

| अ.क्र | पदनाम | रिक्त पदे | १६४% महागाई भत्तानुसार मानधन (प्रति माहे) | शासना मार्फत मानधन (प्रति माहे) | महानगरपालिका मार्फत मानधन (प्रति माहे) | वर्षभराकरीता महानगरपालिके मार्फत मानधन (माहे मार्च २०२१ ते फेब्रुवारी २०२२) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शहर गुणवत्ता आश्वासक समन्वयक | १ | ३५३७७ | ३५००० | ३७७ | ४,५२४/- (३७७ X १ X १२) |
| २ | शहर कार्यक्रम व्यवस्थापक | १ | ३५३७७ | ३५००० | ३७७ | ४,५२४/- (३७७ X १ X १२) |
| २ | स्टाफ नर्स (जी.एन.एम) | ०२ | ३५१२२ | २०००० | १५१२२ | ३,६२,९२८/- (१५१२२ X ०२ X १२) |
| ३ | औषधनिर्माता | ०६ | २०८०८ | १७००० | ३८०८ | २,७४,१७६/- (३८०८ X ०६ X १२) |
| ४ | प्रयोगशाळा तंत्रज्ञ | ०५ | २०८०८ | १७००० | ३८०८ | २,२८,४८०/- (३८०८ X ०५ X १२) |
| ५ | डाटा एन्ट्री ऑपरेटर कम अंकाउटंट | ६ | १९७८६ | १८००० | १७८६ | १,२८,५९२/- (१७८६ X ०६ X १२) |
| ६ | डाटा एन्ट्री ऑपरेटर | २ | १९७८६ | १८००० | १७८६ | ४२,८६४/- (१७८६ X ०२ X १२) |
| ७ | अटेंडंट | ९ | १५०३१ | १५५०० | ० | ० |
| | एकूण | ३२ | | | | १०,४६,०८८/- |

जरी सद्यस्थितीत तक्ता क्र.३ नुसार एकूण कार्यरत पदे ५८ असून त्यांचे मानधनापोटी रक्कम रु.४८,९६,४६८/- व तक्ता क्र.४ प्रमाणे रिक्त पदे ३२ भरली असता मानधनापोटी रक्कम रु.१०,४६,०८८/- असा एकूण रक्कम रु.५९,८८,२५२/- इतका खर्च विभागास अपेक्षित आहे.

राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान (NUHM) अंतर्गत ११ महिन्याच्या कंत्राटी पध्दतीवर कार्यरत कर्मचा-यांना शासन धोरणानुसार मानधन अदा करणेकरीता महानगरपालिकेच्या निधीतून Vasai Virar City Municipal Corporation's Integrated Health & Family Welfare Society या आय.सी.आय.सी.आय. बँकेच्या खात्यात (खाते क्रमांक

रु. ५९,४२,५५६/- खर्च करणेकरीता उपलब्ध करुन देण्यात आले होते. त्यापैकी रक्कम रु. ४५,६२,९४९/- मानधनावर खर्च करण्यात आले व रु. १३,७९,६०७/- इतकी रक्कम सदर खात्यात शिल्लक आहे. त्यामुळे माहे मार्च २०२२ ते फेब्रुवारी २०२३ पर्यंतच्या मानधना करीता आता वर्ग होणारी वरील तक्ता क्र.३ नुसार रक्कम रु. ४८,९६,४६८/- मधून रु. १३,७९,६०७/- वजा करुन उर्वरीत रक्कम रु. ३५,१६,८६१/- महानगरपालिकेच्या निधीतून Vasai Virar City Municipal Corporation's Integrated Health & Family Welfare Society Other/Non-PIP Funds या भारतीय स्टेट बँकेच्या खात्यात (खाते क्रमांक ४०८४४४८३७५०) वर्ग करणे आवश्यक आहे.

त्याकरीता सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात **NUHM कर्मचारी वेतन व आशा प्रोत्साहन भत्ता** या लेखाशिर्षाखाली रु.२,३०,००,०००/- इतकी मुळ तरतुद करण्यात आली असून सदरचा अपेक्षित खर्च रु. ३५,१६,८६१/- इतका आहे.

उपरोक्त संदर्भ क्र.१ अन्वये मा.सर्वसाधारण सभा ठराव क्र.८ दि.२०/०४/२०१८ अन्वये NUHM अंतर्गत असलेली प्रपत्र क्र.३ मध्ये नमुद केलेली रिक्त पदांच्या थेट मुलाखतीव्दारे ११ महिन्याच्या कंत्राटी पध्दतीने भरती करुन नियुक्ती करण्यास व शासनाकडून मिळणारे मानधन व महानगरपालिकेच्या हिश्यातून द्यावयाचे मानधन असे एकूण मानधनास मान्यता देण्यांत आली आहे. तसेच भविष्यात शासनाने राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान अंतर्गत मानधनापोटी अनुदान देण्यास बंद केल्यास महानगरपालिकेकडून संपुर्ण पदावर शासनाकडून मिळणारे मानधन व महानगरपालिकेच्या हिश्यातून द्यावयाचे मानधन असे एकूण खर्चाची संपुर्ण रक्कम महानगरपालिकेकडून अदा करण्यास व भविष्यात शासनाने NUHM उपक्रम बंद केल्यास संपुर्ण पदावरील अधिकारी/कर्मचारी वर्गास महानगरपालिकेमध्ये आर.सी.एच.फेज-२ उपक्रमा अंतर्गतच्या धरतीवर महानगरपालिकेने यापुर्वी केलेल्या प्रक्रियेनुसार ११ महिन्याच्या करार पध्दतीने नियुक्त करणेस मान्यता देण्यात आलेली आहे. सदरची मान्यता अबाधीत ठेऊन शासन निर्णयानुसार १६४% महागाई भत्याप्रमाणे होणारे मानधन महानगरपालिकेच्या निधीतून NUHM अंतर्गत कर्मचा-यांना दि.०१/०३/२०२२ पासून अदा करणेकरीता तसेच भविष्यात शासन निर्णयानुसार वेळोवेळी होणाऱ्या महागाई भत्यात व इतर भत्यात वाढ केल्यास ती वाढ NUHM अंतर्गत अधिकारी/कर्मचाऱ्यांना ९०% च्या मर्यादेत राहून अदा करणेकरीता महानगरपालिकेच्या निधीतून रक्कम रु. ३५,१६,८६१/- Vasai-Virar City Municipal Corporation's Integrated Health & Family Welfare Society Other/Non PIP Funds या भारतीय स्टेट बँकेच्या (खाते क्रमांक ४०८४४४८३७५०) खात्यात मानधनापोटी वर्ग करणेकामी तसेच येणा-या संपुर्ण खर्चास सदरचा प्रस्ताव प्रशासकीय व वित्तीय मंजुरीस्तव सादर.

**ठराव/निर्णय** – प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे NUHM अंतर्गत अधिकारी/कर्मचारी वर्गास महानगरपालिकेमध्ये आर.सी.एच.फेज-२ उपक्रमा अंतर्गतच्या धरतीवर महानगरपालिकेने यापुर्वी केलेल्या प्रक्रियेनुसार ११ महिन्याच्या करार पध्दतीने नियुक्त करणेस मा.सर्वसाधारण सभा दि.२०/०४/२०१८ ठराव क्र.०८ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर ठरावाची मान्यता अबाधित ठेऊन शासन निर्णयानुसार १६४% महागाई भत्याप्रमाणे होणारे मानधन महानगरपालिकेच्या निधीतून NUHM अंतर्गत अधिकारी/कर्मचा-यांना अदा करणेकरीता तसेच भविष्यात शासन निर्णयानुसार वेळोवेळी होणा-या महागाई भत्यात व इतर भत्यात वाढ केल्यास ती वाढ NUHM अंतर्गत अधिकारी/कर्मचा-यांना ९०% च्या मर्यादेत अदा करणेस व त्याकरिता येणा-या संपुर्ण खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

25/08

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रशासकीय ठराव क्र.** ८७९

**विभाग :- घनकचरा व्यवस्थापन**
**दिनांक :-** २६/०८/२०२२

---

**प्रस्तावाचा विषय :-** **वसई विरार शहर महानगरपालिकेच्या गोखिवरे येथील क्षेपणभुमीवरील कचऱ्यापासुन निर्माण होणाऱ्या दुर्गंधी वर नियंत्रण मिळविणेकामी कंपोस्ट कल्चर खरेदीसाठीच्या दरपत्रकातील मे.रविराज केमिकल्स यांच्या दरास मंजूरी देऊन संविदा करुन कार्यादेश देणेस प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत.**

**प्रस्तावाचा मजकूर :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत दैनंदिन रस्ते सफाई, गटार सफाई व शहरातील दैनंदिन निर्माण होणारा घनकचरा उचलण्यासाठी मनपाचे कॉम्पॅक्टर, डंपर, टिपर, ट्रॅक्टर या वाहनांच्या सहाय्याने दैनंदिन ६०० ते ६५० मेट्रीक टन घनकचरा क्षेपणभुमीवर टाकण्यात येतो. परंतु सदरील दैनंदिन घनकचऱ्यावर कोणत्याही प्रकारची प्रक्रिया होत नसल्याने सदरील पडीक कचऱ्याची दुर्गंधी संपुर्ण परिसरात पसरत असल्याबाबत नागरीकांच्या तक्रारी प्राप्त होत आहेत. सदर बाबत कचऱ्याची योग्य व शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्याकरिता मनपाचे प्रकल्प प्रस्तावीत केले आहे.

सदरील प्रकल्प उभारण्यास अंदाजे २ वर्ष कालावधी लागणार असल्याने जुन्या कचऱ्यावर कल्चरची फवारणी केल्यास सदरील कचऱ्याचे खत तयार होऊन सदर कचऱ्यापासुन निर्माण होणारी दुर्गंधी कमी होण्यास मोठया प्रमाणात मदत होणार आहे. तरी सदरील कल्चर खरेदीसाठी दिनांक १५/०७/२०२२ रोजी पासून ते दिनांक २६/०७/२०२२ पर्यंत दरपत्रके मागविण्यात आली होती. सदरील दरपत्रकामध्ये ३ दरपत्रकदारकांनी सहभाग नोंदविला आहे. त्यामध्ये सर्वात लघुत्तम दराचे दरपत्रकदार **मे.रविराज केमिकल्स** यांचा प्रति किलो प्रमाणे रक्कम रु.३७५/- एवढा दर प्राप्त झाला आहे. सदरील दर दिनांक ०८/०८/२०२२ रोजी निविदा समिती समोर ठेवला असता निविदा समितीने **रक्कम रु.३७५/-** प्रति किलो या **मे.रविराज केमिकल्स** यांच्या दरास मंजूरी दिली आहे. तरी २५०० किलो **कंपोस्ट कल्चर** खरेदीस खालीलप्रमाणे खर्च होणार आहे.

| अ.क्र. | कल्चरचे नाव | दरपत्रकदारकाचे नाव | आवश्यक कंपोस्ट कल्चर | GST सह प्राप्त दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|---|
| १ | कंपोस्ट कल्चर पावडर | मे.रविराज केमिकल्स | २५०० किलो | रु.३७५/- | रु.९,३७,५००/- |

वरीलप्रमाणे **कंपोस्ट कल्चर** खरेदी करण्यासाठी **रक्कम रु.९,३७,५००/- (अक्षरी रक्कम रु.नऊ लक्ष सदतीस हजार पाचशे मात्र)** एवढा खर्च होणार आहे. सदरील खर्च सन २०२२-२३ या वित्तीय वर्षातील अर्थसंकल्पीय **साफसफाई जंतुनाशक खरेदी** या लेखाशिर्षा मधील तरतुद **रु.५ कोटी** मधून भागविणे शक्य आहे.

तरी लघुत्तम दरपत्रकदार **मे.रविराज केमिकल्स** यांच्याकडून **कंपोस्ट कल्चर** खरेदी करणेस करारनामा करुन कार्यादेश देणेस व होणाऱ्या **रक्कम रु.९,३७,५००/-** एवढ्या खर्चास प्रशासकीस व वित्तीय मान्यता मिळणेकामी पुढील ठराव करण्यात येत आहे.

**ठराव निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या गोखिवरे येथील क्षेपणभुमीवरील कचऱ्यापासुन निर्माण होणाऱ्या दुर्गंधी वर नियंत्रण मिळविणेकामी कंपोस्ट कल्चर खरेदी साठीच्या दरपत्रकातील मे.रविराज केमिकल्स यांच्या लघुत्तम दर **रक्कम रु.३७५/-** प्रति किलो एवढ्या दरास मंजूरी देऊन तसेच त्यांच्या समवेत संविदा करुन कार्यादेश देणेस व होणाऱ्या एकूण **रक्कम रु.९,३७,५००/- (अक्षरी रक्कम रु.नऊ लक्ष सदतीस हजार पाचशे मात्र) एवढ्या खर्चास** प्रशासकीय व वित्तीय मान्यता देणेबाबत.

२५/०४

**(अनिलकुमार पवार)**
**आयुक्त तथा प्रशासक**
**वसई विरार शहर महानगरपालिका**

# वसई – विरार शहर महानगरपालिका


मुख्य कार्यालय, विरार पुर्व, जि.-पालघर, पिन नं. ४०१ ३०५

दुरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७,

ई-मेल- vasaivirarcorporation@yahoo.com


---

प्रशासकिय ठराव क्र. ८२० | विभाग :- विदयुत विभाग

दिनांक :- २६/०८/2022

---

**प्रस्तावाचा विषय**:- वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (डी) कार्यक्षेत्रातील चौकात सुशोभिकरण अंतर्गत विद्युतीकरण करणे कामी प्रशासकिय व वित्तीय मान्यता मिळणेंबाबत......

---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

1. अंदाजपत्रकीय रक्कम :- 9,71,667/- (सन 2021-22 चे सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) जिल्हा दरसुचीनुसार)

2. कामाची आवश्यकता :- महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, यांचे दि.28 जुलै 2022 रोजीचे शासन परिपत्रक क्र.संकिर्ण-2022/प्र.क्र.225/नवि-20 नुसार 1) शहरातील मध्यवर्ती चौकात स्वच्छता करणे, चौकात सुशोभिकरण करणे यावर जागा उब्धतेनुसार भित्ती चित्रे, कारंजे, शिल्प उभारणे व सामाजिक संदेश देणारे व जनजागृती करणारे चित्र रेखाटणे व 2) शहरातील शिल्पे, कारंजे, जलाशये, भयारीमार्ग, प्रमुख वारसा स्थळे (हेरिटेझ इमारती) इत्यादी प्रमुख ठिकाणी एल.ई.डी प्रकाश योजना व रोषणाई करणे बाबत नमुद आहे.
त्याअनुषंगाने "आझादी का अमृत महोत्सव" अंतर्गत प्रभाग समिती (डी) कार्यक्षेत्रातील 1) राज नगर चौक, नालासोपारा (पुर्व), 2) अग्रवाल चौक, फायर ब्रिगेड जवळ, नालासोपारा (पुर्व), 3) वसंत नगरी चौक, एव्हरशाईन सिटी रोड, नालासोपारा (पुर्व), 4) वसंत नगरी मैदान चौक, नालासोपारा (पुर्व), 5) वसंत नगरी गेट चौक, नालासोपारा (पुर्व), 6) चंदन नाका चौक, आचोळे रोड, नालासोपारा (पुर्व) इ. ठिकाणी बांधकाम विभागाकडुन चौक सुशोभिकरण करणेंत येत आहे. तरी सदर चौकात असलेले हायमास्ट वरील सोडीयम दिवे बदलुन एल.ई.डी दिवे वर नमुद संदर्भिय परिपत्रकान्वये बदलणे आवश्यक आहे.

3. जागेची मालकी :- महानगरपालिका

4. कामाचे स्वरुप :- 200 वॅट एल.ई.डी फ्लड लाईट फिटींग-16 नग, 150 वॅट एल.ई.डी फ्लड लाईट फिटींग- 26 नग, 4 x4sq.mm आर्मड केबल- 50-मी, 4 x6sq.mm आर्मड केबल- 50 मी, 1.6mm टर्मिनल बॉक्स - 5 नग, जी.आय.शिट - 50sq.mm.

उपरोक्त वर नमुद केलेल्या कामाकरिता होणारा खर्च सन 2022-23 या वित्तीय वर्षातील "इतर दिवाबत्ती व्यवस्था" या लेखाशिर्षकातील रक्कम 15,00,00,000/- रुपये तरतुदी मधून भागविण्यात येईल.

सबब सदर प्रस्ताव महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 अन्वये प्रशासकीय व वित्तीय मान्यतेस्तव सादर.

---

**प्रस्तावाचा ठराव :-** वसई विरार शहर महानगरपालिका, प्रभाग समिती (डी) कार्यक्षेत्रातील चौकात सुशोभिकरण अंतर्गत विद्युतीकरण करणे कामी येणाऱ्या रक्कम 9,71,667/- रुपये खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 नुसार प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

23/08

**(अनिलकुमार पवार)**
आयुक्त तथा प्रशासक
वसई विरार शहर महानगरपालिका

# वसई-विरार शहर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, विरार (पू)., ता.वसई, जि.पालघर, पिन – ४०१ ३०५
दूरध्वनी – ०२५०-२५२५१०१/०२/०३/२०४/०५/०६, फॅक्स – ०२५०-२५२५१०७
ई मेल – vasaivirarcorporation@yahoo.com

प्रशासकीय ठराव क्र. ८२१

विभाग – स्थानिक संस्था कर
दि.२६/०८/२०२२

**प्रस्तावाचा विषय:-** स्थानिक संस्था कर निर्धारण न झालेल्या नोंदणीकृत आस्थापनांचे कर निर्धारण करणेकामी कर निर्धारण कामाचा अनुभव असलेले महानगरपालिकेचे कर्मचारी यांना स्था.सं.क. विभागात वर्ग करणे तसेच अनुभवी असे निवृत्त विक्री कर अधिकारी व ठेका कर्मचारी यांची तात्पुरत्या स्वरुपात स्था.सं.क. विभागाकरीता नेमणूक करणेबाबत.

**प्रस्तावाचा मजकूर:-** सविनय सादर करण्यात येते की, शासन अधिसूचना क्र. स्था.सं.क.०२०९/ प्र.क्र.६५/०९/ नवि-३४ दि.२५/०३/२०१० नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१० च्या अधिसुचनेस प्रसिद्धी देणेत आलेली आहे. शासन अधिसूचना क्र. स्था.सं.क.२०१०/प्र.क्र.१३२/१०/नवि-३४ दि.०९/०२/२०११ नुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (१९४९ चा मुंबई ५९) च्या कलम १२७ च्या उप-कलम (२) च्या खंड (ककक) द्वारे प्रदान शक्तींचा आणि या संबंधात त्यास समर्थ करणाऱ्या अन्य सर्व शक्तींचा वापर करून महाराष्ट्र शासनाने वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत दि.०१/०४/२०११ पासून उपभोग, उपयोग किंवा विक्री यासाठी शहराच्या हद्दीमध्ये होणाऱ्या मालाच्या प्रवेशावर जकात किंवा उपकर यांचे ऐवजी स्थानिक संस्था कर (LOCAL BODY TAX) लागू करण्यात आलेला आहे. त्याअनुषंगाने वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत स्थानिक संस्था कराची अंमलबजावणी करण्यात आलेली असून शहराच्या हद्दीत व्यवसाय करणारे व नोंदणीस पात्र असणाऱ्या आस्थापनांची दि.०१/०४/२०११ पासून स्थानिक संस्था कराची नोंदणी करण्यात आलेली आहे. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत एकूण ४२४९९ इतक्या आस्थापना स्थानिक संस्था कर अंतर्गत नोंदणीकृत झालेल्या होत्या.

स्थानिक संस्था कर अंमलबजावणीचे कामकाज करणेसाठी सुरुवातीच्या काळात एकूण ६४ कायम कर्मचारी व १६४ ठेका कर्मचारी कार्यरत होते. स्थानिक संस्था कर विभागात कार्यरत कर्मचारी यांचेमार्फत पुढीलप्रमाणे कामकाज करण्यात येत होते; नोंदणीस पात्र आस्थापनांना स्थानिक संस्था कर नोंदणी करणेकामी नोटीस बजावणे, नोंदणी फॉर्म चे वितरण करणे, स्थानिक संस्था कर भरणा करणेकामी नोटीस बजावणे, विवरण पत्र सादर करणेबाबत नोटीस बजावणे, कर निर्धारण सुनावणीस उपस्थित राहणेकामी नोटीस बजावणे, कर निर्धारणास आवश्यक अभिलेख/दस्ताऐवज सादर करणेकामी नोटीस बजावणे, निर्धारणानुसार येणारे कर, शास्ती व व्याजाचा भरणा करणेकामी नोटीस बजावणे इत्यादी कामकाज करण्यात येत होते.

स्थानिक संस्था कर निर्धारणाचे कामकाज करणेकरीता सी. ए. पॅनलची आवश्यकता होती. करिता स्थानिक संस्था कर विभागासाठी कर निर्धारण करणेकामी सनदी लेखापाल (C.A.) तसेच इतर अनुभवी व्यक्तींची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करणेबाबत मा.सर्वसाधारण सभा दि.१३/१२/२०११ ठराव क्र.२३ अन्वये मंजुरी घेण्यात येऊन निविदा प्रक्रिया राबविण्यात आलेली होती. मा.स्थायी समिती सभा दि.२०/१२/२०१२ ठराव क्र.७३६ अन्वये स्थानिक संस्था कराचे विवरणपत्रे तपासणीकरिता प्राप्त झालेल्या निविदांचे दर आणि संविदा करणेस मंजुरी देण्यात आलेली होती.

संविदा मंजुरीनुसार खालीलप्रमाणे सी. ए. पॅनल समवेत करारनामा करून त्यांना नेमणूक आदेश देणेत आलेले होते.

| अ. क्र. | कार्यादेश जा.क्र. | दिनांक | सी. ए. पॅनलचे नांव |
|---|---|---|---|
| १. | स्था.सं.क.१३८३ | ०२/०२/२०१३ | मे. संदीप शाह अँण्ड कंपनी |
| २. | स्था.सं.क.१३८४ | ०२/०२/२०१३ | मे. ए. डी. अंजीकर अँण्ड कंपनी |
| ३. | स्था.सं.क.१३८५ | ०२/०२/२०१३ | मे. सतीश नागरे अँण्ड असोशिएट्स |
| ४. | स्था.सं.क.१३८६ | ०२/०२/२०१३ | मे. हार्वेस्ट रिसर्च अँण्ड मॅनेजमेंट प्रा.लि. |
| ५. | स्था.सं.क.१३८७ | ०२/०२/२०१३ | मे. फाऊंटनहेड इन्फो सोल्युशन प्रा.लि. |
| ६. | स्था.सं.क.१३८९ | ०२/०२/२०१३ | मे. शुभम कॉमर्स प्रा.लि. |
| ७. | स्था.सं.क.१३९० | ०२/०२/२०१३ | मे. गौरांग बी. शाह अँण्ड कंपनी |

उपरोक्त सी. ए. पॅनल कडून कर निर्धारणाचे कामकाज पुढीलप्रमाणे करण्यात येत होते;

कर निर्धारण सुनावणीत सादर करण्यात आलेले त्यांचे आस्थापनांचे लेखे, दस्तऐवज, नोंदवह्या, देयके, कागदोपत्री पुरावे, तसेच आयात केलेल्या वस्तूवर भरणा केलेला कराचा दर हा मंजूर दरसूचीनुसार आहे किंवा नाही? विवरणपत्रात दावा केलेली वजावट ही नियमानुसार योग्य आहे किंवा नाही इत्यादींची पडताळणी करण्यात येत होती. त्याआधारे विवरणपत्राची तपासणी करण्यात येत होती. त्यानुसार आस्थापनेचे यथोचित कर दायित्व तसेच नियमानुसार प्रदेय व्याज व शास्तीची रक्कमेची परिगणना करण्यात येऊन कर निर्धारण आदेश तयार करणेत येत होते. सी. ए. पॅनल यांचे देयकापोटी येणारा खर्च भागविणेकामी "स्थानिक संस्था कर सनदी सल्लागारासह ठेका कर्मचारी" या लेखाशिर्षाअंतर्गत अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आलेली होती. परंतू विवरणपत्र तपासणीकामी निश्चित केलेला नियत कालावधी उलटून गेल्यानंतरही सी. ए. पॅनल कडून अपेक्षित कामकाज पूर्ण झाले नसले कारणाने मा.आयुक्त महोदय यांचेकडील आदेशान्वये दि.१५/१२/२०१४ पासून उपरोक्त सर्वच सी. ए. पॅनल समवेतचा केलेला करारनामा व कार्यादेश संपुष्टात आलेला आहे.

शासन अधिसूचना क्र.स्था.सं.क.२०१३/प्र.क्र.३९/नवी-३२, दि.२०/०६/२०१३ अन्वये स्थानिक संस्था कर नोंदणीस पात्र व्यापाऱ्यांची आयात करण्याची मर्यादा रु.५,०००/- वरून रु.१ लक्ष व खरेदी विक्री उलाढाल रु.१.५ लक्ष वरून रु.५ लक्ष इतकी करण्यात आली. त्यामुळे नोंदणीस अपात्र ठरलेले स्थानिक संस्था कर नोंदणीतील ११४२९ व्यापारी वगळण्यात आले.

महाराष्ट्र शासनाने शासन अधिसूचना क्र. स्थासंक-२०१५/प्र.क्र.-८२/२०१५/नवि-३२, दि.०३/०६/२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका (स्थानिक संस्था कर) नियम, २०१५ मधील नियम ४८(९)(अ) नुसार प्रदान अधिकारांचा वापर करून व्याज व दंड माफी करीता स्थानिक संस्था कर अभय योजना- २०१५ जाहीर केलेली होती. त्याअनुषंगाने महानगरपालिका हद्दीतील १७७९७ आस्थापनांनी अभय योजनेत भाग घेतलेला असून अभय योजनेअंतर्गत रक्कम रु.५९.०६ कोटी इतका स्थानिक संस्था कराचा भरणा केलेला आहे.

महाराष्ट्र शासनाने शासन अधिसूचना क्र. स्थासंक-२०१५/प्र.क्र.-४७/२०१५/नवि-३२, दि.०१/०८/२०१५ अन्वये ज्या व्यापाऱ्यांची खरेदी किंवा विक्रीची वार्षिक उलाढाल रु.५० कोटीं पेक्षा कमी असलेल्या सर्व व्यापाऱ्यांची स्थानिक संस्था कराची नोंदणी दि.०१/०८/२०१५ पासून रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे महानगरपालिका हद्दीतील खरेदी किंवा विक्रीची वार्षिक उलाढाल रु.५० कोटींच्या वर असलेल्या ५७ आस्थापनांची स्थानिक संस्था कर नोंदणी सुरू राहीली.

एकूण ४२६१६ नोंदणीकृत आस्थापनांपैकी रु. ५ लक्ष खालील उलाढाल असलेल्या ११४२९ आस्थापना वगळता उर्वरित ३१४८७ आस्थापनांचे प्रत्येकी ५ वर्षे गृहित धरून व स्थानिक संस्था कराचे कर निर्धारणा करीता असलेल्या एकूण नस्तीची संख्या १५७४३५ होते. त्यापेंकी कर निर्धारण झालेल्या नस्तीची संख्या ८८७० व अभय योजनेत भाग घेतलेल्या १७७९७ अर्जांची संख्या वगळता एकूण १३०७६८ नस्तीचे कर निर्धारणाचे कामकाज प्रलंबित आहे. त्यातुलनेने स्थानिक संस्था कर विभागात सद्यस्थितीत कार्यरत कर्मचारी प्रमाण फारच कमी असून खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी हे अतिरिक्त कार्यभारासहित कार्यरत आहेत.

महानगरपालिकांच्या उत्पन्नामध्ये येणारी तुट भरून काढण्यासाठी शासनाकडून महानगरपालिकेस सहाय्यक अनुदान देण्यात येत आहे.

केंद्र शासनाने वस्तू व सेवा कर (GST) नव्याने लागू केलेमुळे महाराष्ट्र शासनाने अधिसूचनेद्वारे दि.०१/०७/२०१७ पासून महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियम, २०१७ लागू केलेला आहे. त्यानुसार राज्यात दि.०१/०७/२०१७ पासून स्थानिक संस्था कर हा पूर्णत: रद्द झालेला आहे. स्थानिक संस्था कराचे उच्चाटन झाल्यामुळे शासनाकडून आर्थिक वर्ष २०१७-१८ ते २०२०-२१ या वर्षाकरीता खालीलप्रमाणे अनुदान महानगरपालिकेस प्राप्त झालेले आहे.

| अ. क्र. | आर्थिक वर्ष | स्था.सं. करापोटी शासनाकडून प्राप्त झालेले अनुदान (रु.) |
|---|---|---|
| १. | २०१७-१८ | २७०.०० कोटी |
| २. | २०१८-१९ | ३०१.२० कोटी |
| ३. | २०१९-२० | ३२९.८८ कोटी |
| ४. | २०२०-२१ | ३५६.२८ कोटी |
| ५. | २०२१-२२ | ३८४.७८ कोटी (अपेक्षित) |

महानगरपालिकेला स्थानिक संस्था करापोटी शासनाकडून वरीलप्रमाणे अनुदान प्राप्त होत असले तरीही स्थानिक संस्था कर विभागाकडून आस्थापनांचे कर निर्धारणाची कार्यवाही करून खालीलप्रमाणे स्थानिक संस्था कराचे उत्पन्न प्राप्त झालेले आहे.

| अ. क्र. | आर्थिक वर्ष | स्था.सं.क. कर निर्धारण करून प्राप्त झालेलं उत्पन्न (रु.) |
|---|---|---|
| १. | २०१७-१८ | ३४.११ कोटी |
| २. | २०१८-१९ | ११.४३ कोटी |
| ३. | २०१९-२० | ११.९९ कोटी |
| ४. | २०२०-२१ | ०६.५० कोटी |
| ५. | २०२१-२२ | ०५.०० कोटी (अपेक्षित) |

शासन अधिसूचनेनुसार खरेदी किंवा विक्रीची वार्षिक उलाढाल रु.५० कोटीं पेक्षा कमी असलेल्या सर्व व्यापाऱ्यांना दि.०१/०८/२०१५ पासून स्थानिक संस्था कर भरण्यापासून सूट देण्यात आल्याने स्थानिक संस्था कर विभागातील कर्मचारी वर्ग महानगरपालिकेच्या इतर विभागांना वर्ग करण्यात आलेला आहे. त्यामुळे स्थानिक संस्था कराचे कर निर्धारणाचे काम प्रभावीपणे होत नाही.

कर निर्धारणाचे काम पूर्ण होत नसल्याची कारणे पुढीलप्रमाणे ;

१. सद्यपरिस्थितीत जे काही अधिकारी/कर्मचारी काम पाहत आहेत त्यांची आवश्यकतेनुसार परिगणना केल्यास त्यांचे प्रमाण खूपच कमी असून सद्या कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनाही महानगरपालिकेच्या इतर विभागांचा अतिरिक्त कार्यभार सोपविलेला आहे.

२. सदर व्यापाऱ्यांवर अभियोग, दावे दाखल करावयाचे झाल्यास विभागाला आवश्यक लागणारा मनुष्यबळ, साधनसामुग्री व कर निर्धारणाकरीता प्रशिक्षित असा कर्मचारी वर्गाचा अभाव ही प्रमुख कारणे आहेत.

कर निर्धारणाचे काम पूर्ण करणेच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजनेंची आवश्यकता आहे;

१) कर निर्धारण करावयाची शिल्लक प्रकरणे गृहीत धरून कर निर्धारणास प्रशिक्षित कर्मचारी वर्गाची तात्पुरत्या कालावधीकरीता स्थानिक संस्था कर विभागात नेमणूक करणे.

२) व्यापाऱ्यांना कर निर्धारणास दोन वेळा संधी देऊन सुनावणीस उपस्थित न राहिलेस उपलब्ध कागदपत्रांवरून त्यांचे कर निर्धारण योग्य शक्तीनुसार करणे .

३) विवरणपत्र दाखल न केलेल्या आस्थापनांवर दिवाणी न्यायालयात अभियोग दावे दाखल करणे.

४) योग्य शक्तीनुसार कर निर्धारण पूर्ण केल्यानंतर कराची रक्कम न भरल्यास बँक खाती गोठविणे, मालमत्ता जप्तीची कारवाई करणे व मालमत्ता लिलाव करून वसुली करणे.

उपरोक्त उपाययोजना केल्यास स्थानिक संस्था कर निर्धारणाचे काम लवकरात लवकर पूर्ण होईल व महानगरपालिकेस आर्थिक उत्पन्न त्वरित प्राप्त होईल.

महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक. वविम-१९११/प्र.क्र.६४९/नवि-२३ दि.०९/०९/२०१४ अन्वये वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या स्थानिक संस्था कर विभागाकरीता मंजूर आकृतीबंध खालीलप्रमाणे आहे;

| अ. क्र. | पदाचा तपशील | मंजूर पदांची संख्या | प्रस्तावित नवनिर्मित पदे | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | उप-आयुक्त | ० | १ | १ |
| २. | महापालिका सहाय्यक आयुक्त | ० | २ | २ |
| ३. | अधिक्षक | २ | ४ | ६ |
| ४. | उप-अधिक्षक | ० | ८ | ८ |
| ५. | वरिष्ठ लिपिक | ५ | ११ | १६ |
| ६. | लिपिक टंकलेखक | १० | १० | २० |
| ७. | लघुलेखक (उच्च श्रेणी) | ० | १ | १ |
| ८. | लघु टंकलेखक | ० | १ | १ |
| ९. | असिस्टंट रेकॉर्ड कीपर | ० | १ | १ |
| १०. | शिपाई | १० | ० | १० |
| | **एकूण पदे** | **२७** | **३९** | **६६** |

एकूण उपरोक्त ६६ पैकी २३ पदे ही शासनाने महानगरपालिकेची अधीक्षक पदे मंजूर करतांना व्यपगत केलेली आहेत. म्हणजेच सद्यपरिस्थितीत ४३ पदे अद्यापही स्थानिक संस्था कर विभागासाठी मंजूर आहेत. परंतु असे असतांनाही फक्त ७ कर्मचारी पूर्ण वेळ कार्यरत असून ७ अधिकारी/कर्मचारी हे पालिकेचे इतर विभाग सांभाळून हे कामकाज पाहत आहेत. त्याचा तपशील खालीलप्रमाणे;

त्यातुलनेने स्थानिक संस्था कर विभागात सद्यस्थितीत कार्यरत कर्मचारी प्रमाण फारच कमी असून खालीलप्रमाणे अधिकारी/कर्मचारी हे अतिरिक्त कार्यभारासहित कार्यरत आहेत.

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचारी | पदनाम | सध्या कार्यरत विभाग | पूर्णवेळ कार्यभार | अतिरिक्त कार्यभार | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.प्रदीप जांभळे पाटील | उप-आयुक्त | स्था.सं.कर, बाजार कर | ०० | ०१ | ०१ |
| २. | श्री.विश्वनाथ तळेकर | प्र.सहा. आयुक्त | स्था.सं.कर, वाहन व परिवहन, विधी | ०० | ०१ | ०१ |
| ३. | श्री.विजय चव्हाण | स्था.सं.कर अधिकारी | स्थानिक संस्था कर | ०० | ०१ | ०१ |
| ४. | श्री.कल्पेश पाटील | स्था.सं.कर अधिकारी | स्था. सं. कर | ०१ | ० | ०१ |
| ५. | श्री.मनोज पाटील | लिपिक | स्था. सं. कर | ०१ | ० | ०१ |
| ६. | श्री.कुमार पिलेना | लिपिक | स्था. सं. कर | ०१ | ०० | ०१ |
| ७. | श्री.ज्ञानेश्वर जाधव | लिपिक | स्था. सं. कर | ०१ | ०० | ०१ |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ८. | श्री.हर्षद राऊत | लिपिक | स्था. सं. कर | ०१ | ०० | ०१ |
| ९. | श्री.विनोद लोंढे | लिपिक | स्था. सं. कर | ०१ | ०० | ०१ |
| १०. | श्री.अभिजित कोळी | लिपिक | स्था. सं. कर | ०१ | ०० | ०१ |
| ११. | श्री.प्रशांत चौधरी | लिपिक | स्था. सं. कर, विधी | ०० | ०१ | ०१ |
| १२. | श्री.गणेश पाटील | लिपिक | स्था. सं. कर, माहिती व जनसंपर्क | ०० | ०१ | ०१ |
| १३. | श्री.विजय बसवत | शिपाई | स्था. सं. कर, विधी | ०० | ०१ | ०१ |
| १४. | श्री.रोनील शिंदे | शिपाई | स्था. सं. कर | ०१ | ०० | ०१ |
| **एकूण पदे** | | | | **०८** | **०६** | **१४** |

सद्यपरिस्थितीत कार्यरत कर्मचाऱ्यांकडून कर निर्धारण पूर्ण होणे शक्य नाही. करीता दि.१८/०२/२०२२ रोजी सनदी लेखापाल नियुक्त करणेकामी परवानगी मिळणेस्तव प्रस्ताव सादर करणेत आला होता. परंतू सदर प्रस्तावास अंतिम मान्यता मिळालेली नाही. करीता यावर पर्याय म्हणून मा.आयुक्त महोदय यांनी दि.२५/०७/२०२२ रोजी घेतलेल्या आढावा बैठकीस सदरचा मुद्दा चर्चेस घेतला असता, मा.उप-आयुक्त सो. यांनी कर्मचाऱ्यांच्या कमतरतेची समस्या सादर केली होती. त्यावर उपाय म्हणून मा.आयुक्त महोदय यांनी महानगरपालिकेचे अनुभवी कर्मचारी घेणेबाबत सूचीत करणेत आले. यावरून खालीलप्रमाणे प्रस्ताव;

स्थानिक संस्था कर निर्धारणाचे काम लवकरात लवकर पूर्ण होणेकामी व प्रलंबित कर निर्धारणाचा विचार करता स्थानिक संस्था कर निर्धारण कामाचा अनुभव असलेल्या खालीलप्रमाणे कर्मचारी यांना पूर्णवेळ स्थानिक संस्था कर विभागाकडे वर्ग करणेसाठी यादी;

| अ. क्र. | अधिकारी / कर्मचारी | पदनाम | सध्या कार्यरत विभाग |
|---|---|---|---|
| १. | श्री.अरुण एल. जानी | अधिक्षक | प्रभाग समिती सी चंदनसार |
| २. | श्री.सुरेश ह. पाटील | अधिक्षक | प्रभाग समिती ए बोळींज |
| ३. | श्री.गणेश वसंत पाटील | लिपिक | माहिती व जनसंपर्क विभाग मुख्यालय |
| ४. | श्री.जगदीश महिडा | लिपिक | जाहिरात विभाग मुख्यालय |
| ५. | श्री.दिनेश चौधरी | लिपिक | प्रभाग समिती आय वसई |
| ६. | श्री.प्रशांत र. चौधरी | लिपिक | विधी विभाग मुख्यालय |
| ७. | श्री.विजय शिंदे | लिपिक | प्रभाग समिती एफ पेल्हार |
| ८. | श्री.मिलिंद इंगळे | लिपिक | जाहिरात विभाग मुख्यालय |
| ९. | श्री.प्रदीप आवडेकर | लिपिक | आस्थापना विभाग मुख्यालय |

| | | | |
|---|---|---|---|
| १०. | श्री.भावेश प. पाटील | लिपिक | प्रभाग समिती डी आचोळे |
| ११. | श्री.रविराज र. वळंजे | लिपिक | वाहन व परिवहन विभाग |
| १२. | श्री. संदीप चं. दांडेकर | लिपिक (ठेका) | प्रभाग समिती जी वालीव |
| १३. | श्री.घायल सि. मोरे | लिपिक (ठेका) | प्रभाग समिती जी वालीव |
| १४. | श्री.अमित मा. पाटील | मजूर (ठेका) | प्रभाग समिती एच नवघर माणिकपूर |
| १५. | श्री.पराग न. पाटील | लिपिक (ठेका) | वाहन व परिवहन तथा विधी विभाग मुख्यालय |
| १६. | श्री. विजय बसवत | शिपाई | स्थानिक संस्था कर व विधी विभाग मुख्यालय |

(ब) अनुभवी ४ निवृत्त विक्री कर अधिकारी घेणे .

(क) तसेच या व्यतिरिक्त १० लिपिक-टंकलेखक महानगरपालिकेचे ठेकेदार मे.स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांचेकडून घेणे.

वरीलप्रमाणे एकूण ३० अधिकारी/कर्मचारी स्थानिक संस्था कर विभागास उपलब्ध झाल्यास स्थानिक संस्था कराचे कामास गती येऊन महानगरपालिकेच्या उत्पन्नात वाढ होईल.

सदर कामी होणारा खर्च भागविणेकामी सन २०२२-२३ या वित्तीय वर्षात **"स्थानिक संस्था कर सनदी सल्लागारासह ठेका कर्मचारी"** या लेखाशीर्षाखाली रक्कम रु.१,२५,००,०००/- इतकी अर्थसंकल्पीय तरतूदीमधून करता येईल.

सदर प्रकरणी मा.आयुक्त महोदय यांनी मा.मुख्य लेखापरीक्षक यांचेकडून अभिप्राय मागविले असता मा.मुख्य लेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेले आहेत;

१. विभागाच्या प्रस्तावास अनुसरून सेवा निवृत्त अधिकारी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग यांचे दि.१७/१२/२०१६ व दि.२१/०२/२०१८ नुसार घेण्यास हरकत नाही.

२. ठेका कर्मचारी मंजूर निविदाधारक मे.स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांचेकडून उपलब्ध करून घेता येतील.

३. पूर्व पृष्ठावर नमूद स्थायी कर्मचारी घेणेबाबत कोणतेही अभिप्राय नाहीत.

४. मंजूर आकृतीबंधात विभागाला जी पदे मंजूर असतील त्या पेक्षा सदर पदे जास्त होत असतील तर विभागाने पुनःविनियोजन/समायोजन करून उपलब्ध करून घेण्याची कार्यवाही विभागाने स्वतंत्रपणे करणे आवश्यक आहे.

५. सदर अधिकारी/कर्मचारी घेतल्यावर त्यांचे वेतन/मानधन इत्यादी पोटी होणाऱ्या खर्चाच्या प्रमाणात/त्यापेक्षा अधिक उत्पन्न वाढविण्याची जबाबदारी विभागाची राहील.

तरी स्थानिक संस्था कर निर्धारण करणेकामी स्थानिक संस्था कर निर्धारण कामाचा अनुभव असलेल्या कर्मचारी यांना स्थानिक संस्था कर विभागाकडे वर्ग करणेसाठी तसेच याव्यतिरिक्त अनुभवी असे ४ निवृत्त विक्री कर अधिकारी व या १० ठेका लिपिक-टंकलेखक यांना

तात्पुरत्या स्वरुपात स्थानिक संस्था कर विभागात नेमणूक करणेबाबत मंजुरी मिळणेकामी तसेच याकामी होणाऱ्या खर्चास प्रशासकीय व आर्थिक मंजुरीस्तव प्रस्ताव सविनय सादर.

................................................................................................................

**ठराव :-** उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने स्थानिक संस्था कर निर्धारण न झालेल्या नोंदणीकृत आस्थापनांचे कर निर्धारण करणेकामी कर निर्धारण कामाचा अनुभव असलेले महानगरपालिकेचे स्थायी व अस्थायी कर्मचारी यांना स्थानिक संस्था कर विभागाकडे वर्ग करणेस, १० ठेका लिपिक-टंकलेखक हे मंजूर निविदाधारक मे.स्वयंभू ट्रान्सपोर्ट यांचेकडून ३ महिन्याच्या कालावधीसाठी व आवश्यकता असल्यास पुढील ३ महिन्याचे वाढीव मुदतीकरिता उपलब्ध करून घेणेस व अनुभवी असे ४ निवृत्त विक्री कर अधिकारी यांना शासनाचे धोरणाप्रमाणे मानधन तत्वावर स्थानिक संस्था कर विभागात निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात नेमणूक (जास्तीत जास्त ६ महिन्याचे कालावधीसाठी) करणेस तसेच यापोटी होणाऱ्या खर्चास याव्दारे प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

२५/०४

(अनिलकुमार पवार)
आयुक्त तथा प्रशासक
वसई-विरार शहर महानगरपालिका